## सहवेदना

### सुमन चव्हाण




**सातारा :** सदरबझार येथील सत्यम कॉलनीतील ज्येष्ठ नागरिक सौ. सुमन सीताराम चव्हाण (वय ७५) यांचे बंगळूर येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुली, सून, नातवंडे आहेत. ठोसेघर येथील रहिवासी, लष्करातील सेवानिवृत्त अधिकारी सीताराम चव्हाण यांच्या त्या पत्नी होत. त्यांचे सुपुत्र प्रशांत हे हवाई दलात ग्रुप कॅप्टन आहेत. कन्या अलका इंग्लंड येथे डॉक्टर, तर दुसरी कन्या अर्चना हवाई दलात विंग कमांडर आहेत.

### विशाल वायदंडे



**खटाव :** येथील अण्णाभाऊ साठे तरुण मंडळाचे सदस्य, वडाप व्यावसायिक विशाल धोंडिराम वायदंडे (वय ३९) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. सावडणे व दशक्रिया विधी रविवार ६ रोजी खटाव येथे आहे.

### शरद शिंदे



**मायणी :** मोराळे (ता. खटाव) येथील माजी सरपंच शरद कृष्णात शिंदे (वय ५५) यांचे ब्रेन ट्यूमरच्या आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, पत्नी, भाऊ असा परिवार आहे.

### संभाजी पाटील



**कार्वे :** कोडोली (ता. कराड) येथील संभाजी कृष्णा पाटील यांचे अल्प आजाराने निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, तीन मुली, पुतणे, नातवंडे आहेत.

### आत्माराम पवार यांचे निधन



**केळघर :** दरे खुर्द (ता. जावली) येथील प्रथितयश शेतकरी आत्माराम सीताराम पवार (वय ९८) यांचे अल्प आजाराने निधन झाले. पत्रकार दत्ता पवार यांचे ते वडील होत. दरे खुर्द या मूळ गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

---

### एसटी प्रवासावेळी वापर करताना अडचणी : ज्येष्ठ नागरिक, महिलांची गैरसोय

# एनसीएमसी कार्डबाबत प्रवाशांत संभ्रम

**ज्येष्ठ नागरिक व महिलांना सवलतीच्या प्रवासाचा लाभ मिळावा, या उद्देशाने राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ व्हावा, यासाठी सुरू केलेल्या एनसीएमसी कार्ड योजनेबाबत प्रवाशांमध्ये सध्या नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. कार्ड काढल्यानंतर प्रत्यक्ष प्रवासाच्या वेळी त्याचा वापर करताना अनेक अडचणी येत असून यामुळे ज्येष्ठ नागरिक व महिलांची मोठी गैरसोय होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे या योजनेबाबत संताप व्यक्त होत आहे.**

**त. भा. प्रतिनिधी**

**पाटण :** ६५ ते ७५ पर्यंत वय असलेल्या ज्येष्ठ नागरिक व महिलांना एसटी प्रवासामध्ये ५० टक्के सवलत दिली जाते. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी राज्य परिवहन मंडळाकडून एनसीएमसी कार्डची निर्मिती करण्यात आली आहे. या कार्डमुळे एसटीचा प्रवास अधिक सोयीस्कर होईल, तिकीट व्यवहारातील अडचणी कमी होतील आणि सवलतीचा लाभ सहज मिळेल, अशी अपेक्षा प्रवाशांना होती. मात्र कार्ड असूनही अनेक ठिकाणी त्याच्या वापराबाबत अडचणी निर्माण होत असल्याने प्रवाशांचा हिरमोड झाला आहे.





काही वेळा कार्ड असूनही व्यवहार पूर्ण न होणे, मशिनमध्ये कार्डची नोंद न होणे किंवा सवलतीच्या प्रवासाबाबत संभ्रम निर्माण होणे. तसेच कार्डवरील बॅलन्स संपला अथवा कमी झाला असेल तर पूर्ण तिकीट आकारले जाते, अशा तक्रारी प्रवाशांकडून केल्या जात आहेत. परिणामी प्रवाशांना तिकीट व्यवहारासाठी अधिक वेळ द्यावा लागत असून गर्दीच्या वेळी ज्येष्ठ नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रवासातील सवलत ही केवळ सुविधा नसून त्यांच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाची बाब आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक वैद्यकीय उपचार, नातेवाईकांची भेट किंवा अन्य आवश्यक कामांसाठी एसटीने प्रवास करतात. ग्रामीण भागातील महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना कार्ड, रिचार्ज, डिजीटल व्यवहार आदींबाबत तांत्रिकदृष्ट्या माहिती नसते. अशा वेळी कार्ड असूनही तांत्रिक कारणामुळे अडचणी निर्माण झाल्यास त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. तांत्रिक यंत्रणा बिघडल्याचा फटका ज्येष्ठ नागरिकांना बसू नये. कार्डमध्ये काही समस्या असल्यास ती तत्काळ दूर करण्यासाठी एसटीने स्वतंत्र मदत व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी ज्येष्ठ नागरिकांमधून केली जात आहे.

महिला प्रवाशांसाठीही या योजनेचा लाभ सहज आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय मिळणे अपेक्षित आहे. मात्र कार्ड सर्व्हर डाउन, बॅलन्स संपणे, नवीन कार्ड काढल्यानंतर ते मिळेपर्यंत संपूर्ण तिकीट आकारले जाते, अशा प्रकारामुळे अडचणी निर्माण होत असल्याने महिलांना बसमध्येच वेळ खर्च करावा लागतो. काही वेळेस कार्ड असूनही त्यावरील बॅलन्स संपला तर संपूर्ण तिकीट आकारले जाते. त्यामुळे कार्ड 'असून अडचण आणि नसून खोळंबा' अशी अवस्था ज्येष्ठ नागरिकांसह महिलांची झाली आहे. एनसीएमसी कार्ड योजनेतील अडचणींबाबत एसटी महामंडळाने कार्ड रीडर मशिन, नेटवर्क, सर्व्हर, सवलतीची नोंद आणि व्यवहार प्रक्रिया यांची तपासणी करून प्रवाशांना कोणत्याही परिस्थितीत सवलतीपासून वंचित ठेवले जाऊ नये, अशी मागणी केली जात आहे.

**प्रवाशांचे मत**

- **योजनेबाबत स्पष्ट माहिती देण्यासाठी बसस्थानकांवर मदत कक्ष सुरू करावा.**
- **तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.**
- **ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी सुरू केलेली योजना त्यांच्यासाठी त्रासदायक ठरू नये.**
- **एनसीएमसी कार्ड योजनेतील त्रुटी तातडीने दूर करून प्रवाशांना दिलासा द्यावा**

---

## कापशीजवळ वाहनाची लुना एक्सेलला धडक; वृद्धाचा मृत्यू

**त. भा. प्रतिनिधी**



**लोणंद :** कापशी (ता. फलटण) गावच्या हद्दीत टाकूबाईचीवाडी ते कापशी मार्गावर अज्ञात वाहनाने लुना एक्सेलला जोरदार धडक दिल्याने ६७ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला. धडक देऊन वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. लोणंद पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भगवान जगदेवराव झणझणे (वय ६७, रा. सासवड, ता. फलटण) हे ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास लुना एक्सेलवरून टाकूबाईचीवाडी ते कापशी मार्गावरून जात होते. कापशी गावच्या हद्दीत काळंगे यांच्या वस्तीसमोर अज्ञात वाहनावरील चालकाने त्यांच्या लुना एक्सेलला जोराची धडक दिली. या अपघातात भगवान झणझणे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी नेण्यात आले; मात्र त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर अज्ञात वाहनचालक घटनास्थळी न थांबता वाहनासह पसार झाला. याबाबत विजयकुमार निवृत्ती झणझणे (वय ५४, रा. सासवड, ता. फलटण) यांनी लोणंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात चालकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक निरीक्षक शिवाजी जायपत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार बनकर तपास करीत आहेत.

## पोलीस डायरी

### वीज कर्मचाऱ्याला दमदाटी, दोघांवर गुन्हा

**सातारा :** थकीत वीजबिलाच्या अनुषंगाने घरातील वीज मीटर कट करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या कर्मचाऱ्याला मीटर कट करू न देता शिवीगाळ व दमदाटी करून शासकीय कामात अडथळा आणल्याची घटना सातारा तालुक्यातील नेले येथे घडली. याप्रकरणी दोन जणांविरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ तथा लाईनमन अमोल शंकर घुले (वय ३९, रा. रेणुका मंदिरासमोर, घुले चाळ, शाहूनगर, गोडोली, सातारा) यांनी फिर्याद दाखल केली आहे.ही घटना ३ रोजी रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. दत्तात्रय ज्ञानदेव जाधव व अजय जिजाबा जाधव (दोघे रा. नेले, ता. सातारा) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास महिला पोलीस हवालदार कुंभार करीत आहेत.

### बावीस हजारांची हँडबॅग हिसकावली

**सातारा :** भंडाऱ्यासाठी भाविकांकडून स्वेच्छेने देणगी स्वीकारत असलेल्या व्यक्तीला दारू पिण्यासाठी पैसे मागून, पैसे न दिल्याच्या रागातून शिवीगाळ व मारहाण करत त्याच्या गळ्यातील २२ हजार रुपये रोख रक्कम असलेली हँडबॅग जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना गोडोली येथे घडली. याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हर्षद भरत संकपाळ (वय ४६, व्यवसाय–बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स, रा. सिंधू बाग, विंग बी, प्लॉट नं. १०३, विलासपूर, गोडोली, सातारा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार अजय संजय पार्टे (रा. संकपाळ वाड्या शेजारी, गोडोली, ता. जि. सातारा) याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग; तरुणावर गुन्हा

**सातारा :** अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून सार्वजनिक शौचालयात गेल्यानंतर बाहेरून शिवीगाळ करून दरवाजावर दगड मारणे तसेच तिचा फोटो इन्स्टाग्रामच्या स्टेटसवर ठेवून बदनामी केल्याप्रकरणी २० वर्षीय तरुणाविरोधात शाहूपुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ४३ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. त्यानुसार ऋषभ जगन बढेकर (वय २०, रा. ४४७, मंगळवार पेठ, सातारा) याच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## लोणंद नगरपंचायत परिसरात दारू पिऊन धिंगाणा; तिघांवर गुन्हा

**त. भा. प्रतिनिधी**

**लोणंद :** लोणंद नगरपंचायत कार्यालय परिसरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन मोठमोठ्याने आरडाओरडा करून शांततेचा भंग करणाऱ्या तिघांवर लोणंद पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी वेगवेगळ्या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी सात वाजता नगरपंचायत कार्यालयासमोर सचिन बाबसिंग मालके (वय ३५, रा. बाळासाहेब नगर, लोणंद) दारूच्या नशेत आरडाओरडा करून शांततेचा भंग करताना आढळला. त्याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

सायंकाळी साडेसातच्या सुमारास नगरपंचायत कार्यालयाजवळील पाण्याच्या टाकीखाली मोहित सुरेंद्रसिंग ठाकूर (वय १८, रा. श्रीनाथ स्वीट्स, शिरवळ चौक, लोणंद) हा दारू पिऊन सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालताना आढळला. त्याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तर रात्री आठच्या सुमारास नगरपंचायत कार्यालयाच्या पाठीमागे विकास मानसिंह कुमार (वय ३०, रा. श्रीनाथ स्वीट्स, शिरवळ चौक, लोणंद) हा दारूच्या नशेत मोठमोठ्याने आरडाओरडा करून शांततेचा भंग करताना मिळून आल्याने त्याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

> **सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्यांची गय नाही!**
>
> **सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून आरडाओरडा करणे, गोंधळ घालणे अथवा नागरिकांना त्रास होईल असे वर्तन करणे खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांमुळे सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होत असल्याने संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल.**
>
> **■ शिवाजी जायपत्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक**

---

## अल्पवयीनकडून लघुटंकलेखकावर चाकूहल्ला

### भूविकास बँक चौकातील हॉटेलमध्ये थरार; बरगडीखाली गंभीर वार

**त. भा. प्रतिनिधी**

**सातारा :** सकाळच्या सुमारास नाश्ता करण्यासाठी हॉटेलमध्ये गेलेल्या जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयातील लघुटंकलेखकावर १६ वर्षीय अल्पवयीन मुलाने चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास भूविकास बँक चौक परिसरात घडली. या हल्ल्यात संगम नारायण घोळसे (वय ३३, रा. दौलतनगर) यांच्या डाव्या बरगडीखाली चाकूचा वार झाल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, घोळसे हे सकाळी नाश्ता करण्यासाठी भूविकास बँक चौकातील एका हॉटेलमध्ये गेले होते. ते नाश्ता करीत असताना त्यांच्या पाठीमागे बसलेल्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलाने नाश्ता केल्यानंतर बिलाचे पैसे जवळ नसल्याने आजीला मोबाईलवरून फोन केला. मात्र आजीने फोन न उचलल्याने त्याला राग आला. याच रागातून त्याने अचानक घोळसे यांच्यावर चाकूने हल्ला केल्याची प्राथमिक माहिती तपासातून समोर येत आहे.

हल्ल्यात घोळसे यांच्या डाव्या बरगडीखाली चाकूचा वार झाल्याने हॉटेलमध्ये एकच गोंधळ उडाला. रक्तबंबाळ अवस्थेतील घोळसे यांना पाहून नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. हल्ल्यानंतर पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या अल्पवयीन मुलाला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी त्याच्याकडील चाकूही जप्त केला आहे.

दरम्यान, संबंधित अल्पवयीन मुलगा आपल्या आजीकडे राहत असून त्याने साताऱ्यातील एका महाविद्यालयात अकरावीमध्ये प्रवेश घेतल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, त्याच्या बॅगेतही चाकू आढळून आल्याने पोलिसांनी या घटनेची अधिक गांभीर्याने दखल घेतली आहे. त्याच्याकडे चाकू का होता, तो नेमका कशासाठी बाळगत होता आणि घोळसे यांच्यावर झालेला हल्ला अचानक झाला की त्यामागे अन्य काही कारण होते, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

जखमी संगम घोळसे हे सातारा प्रशासकीय इमारतीतील जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात लघुटंकलेखक म्हणून कार्यरत आहेत. प्रशासकीय इमारतीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यावर भरदिवसा हॉटेलमध्ये झालेल्या चाकूहल्ल्यामुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

घटनेची माहिती मिळताच शाहूपुरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अल्पवयीन मुलाला ताब्यात घेऊन हल्ल्याचे नेमके कारण, चाकू त्याच्याकडे कसा आला, हल्ल्यामागे पूर्वनियोजित हेतू होता का, या सर्व बाबींचा तपास सुरू करण्यात आला आहे.

---

## ज्वेलर्स दुकानातून ३.६१ लाखांचा ऐवज लंपास

**त. भा. प्रतिनिधी**

**पाटण :** तालुक्यातील संगमनगर धक्का येथील गीता ज्वेलर्स हे सोन्या–चांदीचे दुकान चोरट्यांनी मंगळवारी मध्यरात्री फोडले. चोरट्यांनी दुकानातील तिजोरी फोडून तब्बल एक किलो ८०० ग्रॅम वजनाचे सुमारे तीन लाख ६१ हजार रुपयांचे दागिने लंपास केले. तसेच सीसीटीव्ही कॅमेराही चोरून नेला. याप्रकरणी कोयनानगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्वेलर्सचे मालक योगेश उत्तम पावसकर (रा. पाटण) यांनी मंगळवारी १ रोजी रात्री साडेसातच्या सुमारास दुकानातील चांदीचे दागिने तिजोरीत ठेवून दुकान बंद केले. कुलूप लावून ते पाटण येथील घरी गेले. रात्री ११.२८ वाजता त्यांनी मोबाईलवरून दुकानातील ऑनलाइन सीसीटीव्ही तपासला असता दुकान सुरक्षित असल्याचे दिसून आले.

बुधवारी २ सकाळी ७.४० वाजता दुकानाशेजारील गारवा कोल्ड्रिंक शॉपीचे मालक प्रकाश काटे यांनी पावसकर यांना फोन करून दुकानाचे शटर उघडे असल्याची माहिती दिली. त्यानंतर पावसकर वडिलांसह सकाळी नऊच्या सुमारास दुकानात पोहोचले. त्यावेळी दुकानाच्या शटरची कुलपे गायब असून शटर सुमारे एक फूट उघडे असल्याचे आढळले. दुकानाबाहेरील सीसीटीव्ही कॅमेराही गायब होता. दुकानात प्रवेश केल्यानंतर लोखंडी तिजोरीतील तसेच शोकेसमधील चांदीचे दागिने गायब असल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी पैंजण, जोडवी, मासोळ्या, लहान मुलांचे करदोडे, मनटी आदी चांदीचे दागिने लंपास केले. तपास सहाय्यक निरीक्षक एस. के. ओलेकर करत आहेत.

---

## सिद्धेश्वर कुरोली येथे घरातून अडीच लाखांच्या ऐवजाची चोरी

**त.भा. प्रतिनिधी**

**वडूज :** सिद्धेश्वर कुरोली (ता. खटाव) येथील यशवंतबाबा आश्रम परिसरात राहणाऱ्या गवंडी कारागिराच्या घरात घरफोडी करून चोरट्यांनी रोख रक्कम व सोन्या–चांदीचे दागिने असा सुमारे अडीच लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. याबाबत किरण नामदेव म्हस्के (रा. शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर) यांनी वडूज पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार म्हस्के यशवंतबाबा मंदिर कुरोली येथे काम करत आहेत. गुरुवार ३ सप्टेंबर रोजी मध्यरात्री त्यांचे संपूर्ण कुटुंब झोपलले असताना अचानक दोन वाजता त्यांची आई जागी झाली. घरातून कोणी तरी बाहेर गेले आहे व दरवाजा उघडा आहे, असे त्यांनी सांगितले. लाईट चालू करून पाहिले असता घरातील पेटीतून दीड लाख रुपये रोकड, एक तोळा सोन्याचे दागिने, दोन मोबाईल व सहा वर्षाच्या मुलाच्या गळ्यातून सोन्याचा ताईत कापून घेऊन चोरटे पळाले होते. पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.



**सिद्धेश्वर कुरोली : म्हस्के यांच्या घराची पाहणी करताना पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे व इतर.**

**लाखोंची चोरी अन् फक्त अर्ज**

अलिकडच्या काळात वडूज पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. मात्र सीआर नोंद वाढू नये याकरिता काही ठाणे अंमलदार रीतसर फिर्याद दाखल करून घेण्याऐवजी फक्त जुजबी अर्ज घेऊन तक्रारदारांचे तात्पुरते समाधान करत आहेत. मागच्या आठवड्यात वाकेश्वर येथे महिलेच्या घरात मोठी चोरी झाली होती. तक्रार देण्यासाठी आलेल्या महिलेसह एका माजी सैनिकास दोन तास ताटकळत ठेवण्यासह महिला कॉन्स्टेबलकडून संबंधितांचा पाणउतारा करण्यात आला होता. अशा प्रकारे कर्तव्यात कसूर करण्याबरोबर लोकांशी उद्धटपणे वागणाऱ्या ठाणे आमदारांची वरिष्ठांनी सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

---

**सोने जिन्नसांच्या लिलावाची जाहीर नोटीस**

**जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कराड**

स.नं. ४९७ आर. के हाईटस, सिव्हील हॉस्पिटल रोड, पोवई नाक्याजवळ

**शाखा- सदरबझार, सातारा**

खालील नमूद शाखेकडील सोने तारण कर्जदार यांनी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड नियमीतपणे केलेली नाही, सबब कर्ज थकबाकीत आहे. त्यामुळे सोने गहाण कर्जाचे खाली नमूद कर्जदाराला जाहीर नोटीस देण्यात येते की, दि.१८/०९/२०२६ पर्यंत अथवा तत्पूर्वी आपल्या कर्जाची येणेबाकी रक्कम व्याजासह परतफेड करावी. परतफेड न केल्यास आपल्या कर्जास तारण असलेल्या जिन्नसाचा जाहीर लिलाव सोमवार दि.२१/०९/२०२६ रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेत संस्थेची शाखा- सदर बझार स.नं. ४९७, आर के हाईटस, सिव्हील हॉस्पिटल रोड, पोवई नाक्याजवळ, सदरबझार, सातारा, ता.जि. सातारा येथे करण्यात येणार आहे. आपल्या कर्जास तारण जिन्नसाच्या विक्रीनंतरही कर्जाची येणे रक्कम (Out Standing) शिल्लक राहिल्यास या थकीत रक्कमेच्या वसुली करीता कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. यदाकदाचित तारण जिन्नासांची विक्री करून रक्कम सव्याज आल्यानंतर काही रक्कम उरल्यास ही रक्कम संस्थेतील कर्जदारच्या सेव्हिंग खाती जमा करण्यात येईल. सदरील कर्जाची मुदत संपलेली असल्याने आपणास संपर्क केलेला होता. परंतु आपण महाराष्ट्रबाहेर असल्याचे तुमच्या मुलीने कळवले. तुमची दुसरी मुलगी सातारा येथे वर नमूद पत्त्यावर रहात असल्याची खात्रीशिर माहिती होती. म्हणून तुम्हास वर नमूद पत्त्यावर दि.२७/०४/२०२६, दि.१७/०६/२०२६ व दि.१०/०८/२०२६ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीसा पाठवल्या होत्या त्या तिन्ही नोटिसीचे लखोटे ``Left address`` असा शेरा मारून पोस्टकडून परत आलेले आहेत. तुम्हास फोन वर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता फोन उचलत नाही असा अनुभव आला.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता | ०४/०९/२०२६ पर्यंत येणे बाकी व त्यापुढे होणारे व्याज |
|---|---|---|---|
| १ | ३१९९/७५ | नरसिंहाचार रंगनाथाचार्य माधवाचार, १६, स्वप्नपुर्ती, विठ्ठलनगर, मु. पो. खेड, ता.जि. सातारा. | २७,१६८/- + व्याज |

लिलावातील संपूर्ण अलंकाराची तपशिलावर माहिती तसेच लिलावाची बयाणा रक्कम, अनामत रक्कम, लिलावाच्या अटी व शर्ती इ तपशील दि.१८/०९/२०२६ पर्यंत संस्थेचे सुट्टीचे दिवस सोडून शाखा- सदरबझार, सातारा येथे संस्थेच्या कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत पाहण्यास मिळतील. कर्जदारांनी स्वत: अगर अधिकृत प्रतिनिधीमार्फत लिलावाच्या ठिकाणी उपस्थित रहावे अन्यथा आपल्या गैरहजेरीत तारण संपूर्ण अलंकाराचा जाहीर लिलाव केला जाईल नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, लिलाव सुरु होईपर्यंत कर्जदार यांनी सव्याज रक्कम भरण्याची कृती केल्यास लिलाव रद्द होऊ शकतो. तसेच कोणतेही कारण न देता लिलाव नामंजूर अथवा तहकुब करण्याचा अधिकार तसेच सदर कामाची कोणतीही अगर सर्व निविदा स्विकारणे अगर नाकारणेचा अधिकार संस्थेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

दिनांक ०४/०९/२०२६.

**शाखा व्यवस्थापक,**
**जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था, कराड**
**शाखा- सदरबझार, सातारा.**

---

## अमित ठाकरे यांच्यावरील गुन्हा मागे घ्या

### 'मनविसे'चे उंब्रज पोलिसांना निवेदन : तीव्र आंदोलनाचा इशारा

**त. भा. प्रतिनिधी**

**उंब्रज :** पुणे येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात महापुरुषांच्या प्रतिमांजवळ शिष्टाचार डावलून लावलेल्या फोटोप्रकरणी कायदेशीर भूमिका मांडल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे (मनविसे) अध्यक्ष अमित राज ठाकरे व इतर मनसैनिकांवर दाखल करण्यात आलेला गुन्हा तत्काळ मागे घ्यावा, अशी मागणी मनविसेच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत शुक्रवारी उंब्रज पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. हे निवेदन उंब्रज पोलिसांमार्फत पुणे पोलीस आयुक्त, गृह विभागाकडे पाठविण्यात येणार असल्याचे मनविसेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना निकृष्ट व सडलेले अन्न पुरविणाऱ्या कॅन्टीन ठेकेदारावर कडक कायदेशीर कारवाई करावी, महापुरुषांच्या रांगेत शिष्टाचार डावलून अनधिकृत फोटो लावणाऱ्या संबंधित प्राचार्यांवर कारवाई करावी तसेच विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठविणारे अमित ठाकरे यांच्यावरील गुन्हा तत्काळ मागे घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर मनविसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.

यावेळी मनविसेचे सातारा जिल्हा सचिव अमोल सुभाष कांबळे, कराड तालुकाध्यक्ष रणजित कदम, शहराध्यक्ष विजय वाणी यांच्यासह संतोष किरतकर्वे, समीर दुधाणे, विजय पवार, प्रवीण चव्हाण, शुभम राठोड, आशुतोष धावरे, सचिन चव्हाण व मनसैनिक उपस्थित होते.

## डीपीमधील तांब्याची तार चोरीला

**सातारा :** चिंचणेर निंब येथील गोटेमाळ शिवारात असलेल्या महावितरणच्या विद्युत डीपीमधून अज्ञात चोरट्याने ५० ते ६० किलो वजनाची सुमारे २५ हजार रुपये किमतीची तांब्याची तार चोरून नेली.

याबाबत महावितरणचे प्रधान तंत्रज्ञ तथा लाईनमन पुरुषोत्तम नारायण जाधव (वय ३८, रा. दत्तनगर, कोडोली, सातारा) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार अज्ञातावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपास हवालदार पिसाळ करीत आहेत.

---

## ज्ञानज्योती प्रज्वलित करणाऱ्या गुरुंना मानाचा मुजरा

"गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर?।" भारतीय संस्कृतीमध्ये गुरूला देवापेक्षाही श्रेष्ठ स्थान दिले आहे. कारण आई–वडील आपल्याला जन्म देतात; परंतु जीवनाला योग्य दिशा देण्याचे, ज्ञानाची वाट दाखविण्याचे व व्यक्तिमत्त्व घडविण्याचे महान कार्य शिक्षक करतात. म्हणूनच शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा व्यक्ती नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा शिल्पकार असतो.

५ सप्टेंबर हा दिवस भारताचे माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस. त्यांच्या शिक्षणाविषयीच्या महान कार्याचा आणि विचारांचा सन्मान म्हणून हा दिवस संपूर्ण भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ उत्सवाचा नसून प्रत्येक शिक्षकाच्या योगदानाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.



शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनातील अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करतात. पुस्तकातील धडे शिकविण्या–बरोबरच ते विद्यार्थ्यांना शिस्त, संस्कार, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, सहकार्य, आत्मविश्वास आणि माणुसकी यांचे धडे देतात. विद्यार्थ्यांच्या छोट्या–छोट्या यशात आनंद मानणारा आणि त्यांच्या अपयशात खंबीरपणे साथ देणारा शिक्षक हा खऱ्या अर्थाने समाजाचा मार्गदर्शक असतो. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाच्या पद्धती बदलल्या आहेत; मात्र शिक्षकाचे महत्त्व कधीही कमी झालेले नाही. कारण तंत्रज्ञान माहिती देऊ शकते, परंतु माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे संस्कारांत रुपांतर करण्याचे कार्य शिक्षकच करू शकतो. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देऊन त्यांना स्वत:ची ओळख निर्माण करण्याची प्रेरणा शिक्षक देतात.

शिक्षकांनी घडविलेले विद्यार्थीच उद्याचे डॉक्टर, अभियंते, शास्त्रज्ञ, अधिकारी, कलाकार, उद्योजक आणि जबाबदार नागरिक बनतात. त्यामुळे राष्ट्राच्या प्रगतीच्या पायाभरणीत शिक्षकांचे योगदान अमूल्य आहे. या पवित्र दिनानिमित्त ज्ञानदानाचे व्रत घेऊन भावी पिढी घडविणाऱ्या सर्व शिक्षकांना मन:पूर्वक सलाम! आपल्या त्यागाला, समर्पणाला आणि कर्तृत्वाला मन:पूर्वक नमन. सर्व आदरणीय शिक्षक–शिक्षिकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! आपल्या ज्ञानाची ज्योत अशीच अखंड तेवत राहो व असंख्य विद्यार्थ्यांचे जीवन उजळत राहो, हीच सदिच्छा!

**■ वैशाली धनंजय वाडकर,**
जि. प. शाळा सदाशिवगड

---

**ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

**नोंदणीकृत कार्यालय:** क्र. ९, एम. पी. नगर, पहिला रस्ता, कोंगू नगर विस्तार, तिरुपूर-६४१६०७ **सीआयएन:** U67100TZ2014PTC020363
**कॉर्पोरेट कार्यालय:** कोहिनूर स्क्वेअर, ४७ वा मजला, एन.सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर पश्चिम, मुंबई - ४०००२८
**संपर्क क्र.** -०२२-६९२३ ११११/९७७३४०६१७५. **ईमेल:** mumbai@omkaraarc.com | **मो.:** +९१ ९७६९१७०७७४

**[परिशिष्ट – IV-A] [नियम ८ (६) सह वाचल्या जाणाऱ्या नियम ९(१)] च्या तरतुदींचा संदर्भ घ्या. स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलावासाठी जाहीर सूचना**

**'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' ("सरफेसी ॲक्ट") सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींनुसार स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषत: खाली नमूद केलेले कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण/बोजा असलेली खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, ज्याचा ताबा सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांकडून ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओमकारा पीएस ०३/२०२५-२६ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्यरत) या सुरक्षित धनकोच्या खाली नमूद केलेल्या थकीत रकमेच्या वसुलीसाठी **२४.०९.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता (बोली सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ २३.०९.२०२६ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत आहे)** ''जसे आहे जिथे आहे'', ''जसे आहे जे आहे'', ''जे काही आहे ते'' आणि विना तक्रार तत्त्वावर विकली जात आहे.
ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओमकारा पीएस ०३/२०२५-२६ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्यरत) यांनी सदर कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/गहाणदार यांच्याकडून थकबाकी असलेली संपूर्ण रक्कम दिनांक २७.०२.२०२६ च्या हस्तांतरण कराराद्वारे 'सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक' कडून मूळ सुरक्षा हितसंबंधांसह प्राप्त केली आहे.
स्थावर मालमत्तेचा तपशील, राखीव किंमत, अर्नेस्ट मनी डिपॉझिट आणि माहिती असलेले बोजे खालीलप्रमाणे आहेत:

| मालमत्तेचा तपशील | कर्जदाराचे नाव | राखीव किंमत | (ईएमडी) | वाढीव बोली |
|---|---|---|---|---|
| फ्लॅट क्र. टी-१, तिसरा मजला, मधुबन संकुल, स. नं. १७०/७डी, मलकापूर नगर - पंचायत मिळकत क्र. २४९३ (जुना क्र. जीए १६७९), मलकापूर नगर पंचायतीच्या हद्दीत, मौजे मलकापूर, ता. कराड, जि. - सातारा. चतु:सीमा: पूर्व: खुला भूखंड, पश्चिम: अंतर्गत रस्ता, उत्तर: खुला भूखंड, दक्षिण: खुला भूखंड. कारपेट क्षेत्र ४०९.४३ चौ. फूट | श्री. सचिन संपतराव देसाई (कर्जदार) सौ. स्नेहल सचिन देसाई (सह–कर्जदार) | रु. ११,८८,०००/- | रु. १,१८,८००/- | रु. १०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| **ई–लिलावाची तारीख:** २४.०९.२०२६ रोजी दुपारी ०१:०० वाजता | **सहभागाचे बोली पत्र/केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ :** २३.०९.२०२६ रोजी संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत | मालमत्तेची पाहणी: **१७.०९.२०२६ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० वाजेपर्यंत** |

**हे प्रसिद्धीकरण म्हणजेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) अन्वये कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदार/गहाणदारांना १५ दिवसांची नोटीस समजण्यात यावी.**
**ज्या इच्छुक बोलीदारांनी ईएमडी जमा केला आहे आणि त्यांना लॉगिन आयडी आणि पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बोली सादर करणे, ई–बोली प्रक्रियेचे प्रशिक्षण इत्यादींमध्ये मदतीची आवश्यकता आहे, ते ई–लिलाव सेवा प्रदाता "मे. सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड", टेलि. हेल्पलाइन: +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी: support@bankeauctions.com, श्री. भाविक पंड्या, मोबाईल: ८८६६६८२९३७, ई-मेल - maharashtra@c1india.com वर संपर्क साधू शकतात आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही चौकशीसाठी अधिकृत अधिकारी, तानाजी मांडवकर, मोबाईल: +९१ ९७६९१७०७७४, ईमेल - tanaji@omkaraarc.com वर संपर्क साधावा.**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) सह वाचल्या जाणाऱ्या नियम ९(१) अन्वये वैधानिक विक्री सूचना**

ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) सह वाचल्या जाणाऱ्या नियम ९ आणि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या तरतुदींनुसार वरील कर्ज खात्याच्या कर्जदारांना १५ दिवसांपेक्षा कमी नसलेली अनिवार्य नोटीस आहे. याद्वारे त्यांना वरील नमूद केलेल्या तारखेला आणि वेळेत ई–लिलावाद्वारे लिलाव/विक्री आयोजित केल्याबद्दल माहिती दिली जात आहे, तसेच विक्री बंद होण्यापूर्वी कोणत्याही वेळी वरील नमूद थकबाकीसह पुढील व्याज आणि सर्व खर्च व शुल्क भरून मालमत्ता मुक्त करण्याची इच्छा असल्यास तसे करण्याचा सल्ला दिला जात आहे. रक्कम भरण्यात कसूर केल्यास, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (५) अंतर्गत विहित केलेल्या कोणत्याही पद्धतीने अधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको यांच्या स्वेच्छेने मालमत्तेची विक्री केली जाईल.

**सही/–**
**तारीख : ०४.०९.२०२६, स्थळ: मुंबई**
**अधिकृत अधिकारी, ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओमकारा पीएस ०३/२०२५–२६ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्यरत)**